Vol 6 Issue 11 August 2017

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**


Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........



**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: http://oldror.lbp.world/**

ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | AUGUST - 2017

REVIEW OF RESEARCH

# मुख्य निवडणूक आयुक्तांच्या कार्याची ओळख



डॉ. तुषार निवृत्ती निकाळजे

*प्रस्तावना :*

कोणतेही कामकाज करण्यासाठी संस्थेस एका व्यक्तीची आवश्यकता असते. त्याकरीता तिला तसे प्रथम अधिकार दिले जातात. नेमणूक करताना तिची पात्रता पाहिली जाते. निवडणूक आयोग ही एक संस्था आहे. आणि तिचे काम करण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्त यांची नेमणूक केली जाते. सदर व्यक्तीस सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाएवढे अधिकार असतात. नेमणूक करताना त्या व्यक्तीचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे. संविधानामधील अनुच्छेद ३२४ कलम (२) व (३) मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नेमणुका, अधिकार, सेवाशर्ती यांच्या तरतुदी केल्या आहेत. १९५० ते २०१७ कालावधीत २१ मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नेमणुका झाल्या आहेत.

| | मुख्य निवडणूक आयुक्त | कालावधी |
|---|---|---|
| १. | सुकुमार सेन | २१/३/१९५० ते १९/१२/१९५८ |
| २. | के.व्ही.के सुंदरमा | २०/१२/१९५८ ते ३०/९/१९६७ |
| ३. | एस.पी. सेन वर्मा | १/१०/१९६७ ते ३०/९/१९७२ |
| ४. | नागेंद्रसिंह | १/१०/१९७२ ते ६/२/१९७३ |
| ५. | टी. स्वामीनाथन | ७/२/१९७३ ते १७/६/१९७७ |
| ६. | एस. एल. शकधर | १८/९/१९७७ ते १७/६/१९८२ |
| ७. | आर. के. त्रिवेदी | १८/६/१९८२ ते ३१/६/१९८५ |
| ८. | आर. व्ही. एस. पेरीशास्त्री | १/१/१९८६ ते २५/११/१९९० |
| ९. | व्ही. एस. रमादेवी | २६/११/१९९० ते ११/१२/१९९० |
| १०. | टी. एन. शेषन | १२/१२/१९९० ते ११/१२/१९९६ |
| ११. | एम. एस. गिल | १२/१२/१९९६ ते १३/६/२००१ |
| १२. | जे. एम. लिंगडोह | १४/६/२००१ ते ७/२/२००४ |
| १३. | टी. एस. कृष्णमूर्ती | ८/२/२००४ ते १५/५/२००५ |
| १४. | बी. बी. टंडन | १६/५/२००५ ते २९/६/२००६ |
| १५. | एन. गोपालस्वामी | २९/६/२००६ ते २०/४/२००९ |
| १६. | एन. बी. चावला | २१/४/२००९ ते ३१/७/२०१० |
| १७. | कुरेशी एस. वाय. | १/८/२०१० ते १०/६/२०१२ |
| १८. | व्ही. एस. संपथ | ११/६/२०१२ ते १५/१/२०१५ |
| १९. | एच. एस. ब्रम्हा | १६/१/२०१५ ते १८/४/२०१५ |
| २०. | नसीम झैदी | १९/४/२०१५ ते ५/७/२०१७ |
| २१. | आचलकुमार ज्योती | ६/७/२०१७ ते २२/१/२०१८ |

या मुख्य निवडणूक आयुक्तांच्या कालावधीमध्ये घडलेल्या घटना व कार्यपध्दती पाहता अनुच्छेद ३२४ नुसार त्यांना अधिकार, जबाबदाऱ्या किती व्यापक स्वरूपाच्या आहेत हे आपल्या लक्षात येईल. मुख्य निवडणूक आयुक्तांना नियमांच्या चौकटीत तसेच न्यायव्यवस्था, परिसीमन आयोग, संसद यांच्या सहमतीने कामकाज करावे लागते. निवडणूक आयोगास जरी स्वायत्तता असली तरी निवडणूक याचिकांसाठी स्वतंत्र न्यायाधीकरणे स्थापन करणे, परिसीमन आयोगाचे सदस्यत्व, संसदेमध्ये निवडणूकविषयक चर्चा यांमध्ये निवडणूक आयुक्तांचा प्रत्यक्ष सहभाग असल्याने इतर मर्यादा आहेत. सन १९७२ पूर्वी मुख्य निवडणूक आयुक्तांचा नियुक्ती कालावधी फक्त पाच वर्षे होता. परंतु १९७२ नंतर त्यामध्ये दुरुस्ती करून पाच वर्षे किंवा वयाची पासष्ट वर्षे करण्यात आला (सेवाशर्ती कायदा १९९१).

१९५२ ते १९७४ पर्यंत केंद्र सरकार आणि निवडणूक आयोग यांच्यातील परस्परसंबंध सौदार्हाचे व सहकार्याचे होते. १९७५ ते १९९० या काळातही विसंवाद निर्माण झाला नाही. कारण या काळात केंद्र सरकारने औपचारिकरीत्या दबाव आणला किंवा हस्तक्षेप केला तरी त्याविरुध्द मुख्य निवडणूक आयुक्त तक्रार करीत नसत. याकाळात व्ही. स्वामीनाथन, एस. एल. शकधर, आर. के. त्रिवेदी आणि आर.व्ही.एस. पेरीशास्त्री हे चौघे सौम्य प्रकृतीचे मुख्य निवडणूक आयुक्त केंद्र सरकारशी तंटा करण्यापेक्षा जमवून घेत असत. असे माजी निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांचे वक्तव्य आहे. यामध्ये तथ्य आहे असे मानल्यास वावगे ठरणार नाही. कारण सन १९९३ साली त्रिसदस्यीय निवडणूक आयोगाबाबतचे झालेले वाद-विवाद, याचिका आणि आवश्यक त्यावेळी माजी निवडणूक आयुक्त एस. एल. शकधर यांनी अत्यंत आवश्यक किंवा आपत्कालीन परिस्थितीत इतर निवडणूक आयुक्त नेमावे असे होते. तसेच इतर आयुक्त नेमताना मुख्य निवडणूक आयुक्त, सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, लोकसभेचे प्रवक्ते यांची सहमती घेणे आवश्यक आहे. एस. एल. शकधर हे १९९१ साली निवडणूक पध्दत सुधारणा समितीचे सदस्य होते.

१९९० च्या नोव्हेंबरमध्ये तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त पेरीशास्त्री यांचे निधन झाले. तत्कालीन पंतप्रधान चंद्रशेखर यांनी कायदा खात्याच्या सचिव श्रीमती व्ही. एस. रमादेवी यांची प्रभारी मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून नेमणूक केली. शासकीय सेवा करत असलेल्या कोणाही प्रशासकाची मुख्य निवडणूक आयुक्तपदी तात्पुरती नेमणूक करणे घटनाबाह्य आहे. हे कायदा खात्याच्या सचिव श्रीमती रमादेवी यांनी केंद्रीय, मंत्रिमंडळाचे लक्ष वेधणे आवश्यक होते. असे असतानाही श्रीमती रमादेवी यांनी सचिवपदाबरोबर मुख्य निवडणूक आयुक्तपदाची अतिरिक्त जबाबदारीही स्वीकारली. संविधानाच्या शिल्पकारांनी जाणून बुजून निवडणूक आयोग सरकारपासून स्वतंत्र राहील अशी व्यवस्था केली आहे. ३० ऑगस्ट १९९२ रोजी निर्वाचन आयोगाने पत्र लिहून श्रीमती रमादेवी यांच्या नियुक्तीची अधिसूचना रद्द केली. त्यांचा कार्यकाल फक्त १४ दिवस (२६/११/१९९० ते ११/१२/१९९०) एवढाच होता.

श्रीमती रमादेवींची नियुक्ती रद्दबातल होण्याची प्रक्रिया चालू असतानाच टी.एन. शेषन यांची दि. १२ डिसेंबर १९९० रोजी मुख्य निवडणूक आयुक्त पदावर नियुक्ती झाली. तद्नंतर शेषन यांनी १२/१२/१९९० ते ११/१२/१९९६ या सहा वर्षांच्या कालावधीत निवडणूक आयोगाने तीस वर्षांपूर्वी तयार केलेली आणि धूळ खात पडलेली आचारसंहिता साफसूफ करून तिची अंमलबजावणी करण्यास सुरूवात केली. परंतु याचा त्रास राजकारण्यांना होऊ लागला. वास्तविक टी. एन. शेषन यांनी निवडणूक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यास सुरुवात केली. राजकारणी, इतर प्रशासकीय अधिकारी यांच्याशी नियमांमधील त्रुटी, दुरूस्त्या, अंमलबजावणी, अधिकार या विषयांच्या सूक्ष्म चर्चा केल्या व टी. एन. शेषन हे सरस ठरू लागल्याने त्यांना वादग्रस्त व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप देण्यात आले.

फेब्रुवारी १९९५ मध्ये बिहार व ओरिसा येथे विधानसभेच्या निवडणुका जाहीर केल्या होत्या, परंतु त्या राज्यांच्या शासनाने मतदान ओळखपत्र तयार करण्याचे काम निवडणुकीपूर्वी पूर्ण केले नव्हते. टी. एन. शेषन यांनी सदर निवडणुका लांबणीवर टाकाव्यात असे सांगितले श्री. लालूप्रसाद यादव यांनी ओळखपत्राअभावी निवडणुका पुढे ढकलू नयेत अशी विनंती केली. दुसरे निवडणूक आयुक्त एम.एस. गिल यांनी ''ओळखपत्राशिवाय निवडणुका लांबणीवर टाकणे असंविधानिक आहे असे म्हटले. नंतर हा वाद सर्वोच्च न्यायालयामध्ये गेला. १९९४ साली सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीमध्ये टी.एन. शेषन यांनी ओळखपत्राचे काम मुदतीत पूर्ण करावे अशी सूचनादेखील केली. परंतु सर्वोच्च न्यायालयाने संविधानातील तरतुदीनुसार ओळखपत्रा अभावी/ओळखपत्राचे काम पूर्ण झाले नाही म्हणून निवडणुका पुढे ढकलता येणार नाहीत असा आदेश दिला.

२१ मे १९९१ रोजी माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचे बॉम्ब स्फोटात निधन झाले. त्यावेळी लोकसभेच्या निवडणुकीची २३ मे १९९१ रोजी होणारी दुसरी फेरी टी. एन. शेषन यांनी १२ जूनपर्यंत लांबणीवर टाकली आणि २६ मे १९९१ ची तिसरी फेरी १५ जूनपर्यंत स्थगित केली. त्यावेळी शरद पवार, जनार्दन रेड्डी, के. करूणाकरन वगैरे नेत्यांच्या शिष्टमंडळाने शेषन यांची भेट घेऊन दुसरी व तिसरी फेरी १२ जूनच्या आधी सात-आठ दिवस उरकून घ्यावी अशी विनंती केली. परंतु टी. एन. शेषन यांनी त्यांची विनंती अमान्य करून जाहीर केलेल्या मुदतीत निवडणुका घेतल्या.

निवडणुकीच्या कामासाठी प्रशासकीय सेवक, सुरक्षा व्यवस्था, मतदार याद्या तयार करणे, मतदान कार्यपध्दती याकरिता नेमणुका करण्याचा अधिकार मुख्य निवडणूक आयुक्तांस आहे. सन १९९१ मध्ये बिहार, राजस्थान, पश्चिम बंगाल याठिकाणी निवडणूक कालावधीत अत्यंत तणावग्रस्त वातावरण असताना तात्काळ राज्यस्तरीय होमगार्डस, सुरक्षेकरिता नेमले होते. तसेच केंद्रीय स्तरावर निवडणूक निरीक्षक व राज्यस्तरावर असे एकूण ८०० निवडणूक निरीक्षक नेमण्यात आले. तसेच निवडणुकीवर होणाऱ्या बेकायदेशीर खर्चांवर लक्ष ठेवण्यासाठी ''निवडणूक खर्च निरीक्षक'' नेमण्यात आले. टी. एन. शेषन यांनी निवडणूक चिन्हांबाबत असलेल्या निवडणूक चिन्ह आदेश १९६७ मध्ये अनुच्छेद ३२४, निवडणूक वर्तन नियम १९६१ कलम ५ व १० मध्ये सुधारणा सुचविल्या होत्या. टी.एन. शेषन यांनी याकरिता मुख्य निवडणूक आयुक्तास लोकप्रतिनिधित्व कायद्यातील कलम २९४ नुसार असलेल्या अधिकाराचा वापर केला.

मुख्य निवडणूक आयुक्ताने निवडणुकीच्या कामाकरिता नेमलेल्या अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास या कामाव्यतिरिक्त इतर काम करू न देण्याचा अधिकार मुख्य निवडणूक आयुक्तास आहे. भारताचे महान्यायवादी मीलन बॅनर्जी यांनी हा प्रश्न संसदेमध्ये उपस्थित केला होता. त्यांच्या म्हणण्यानुसार निवडणुकीच्या कालावधीमध्ये जरी शासकीय सेवक किंवा अधिकारी निवडणूक आयुक्तांच्या आधिपत्याखाली काम करीत असला तरी त्यावर नियुक्ती अधिकाऱ्याचा अधिकार असतो या प्रश्नावर मसुदा समितीचे सदस्य के. एम. मुन्शी यांनी एच. व्ही. पाटसकर आणि एच.एन. कुंझ्रु यांच्या भाषणांचा अर्थ समजावून निर्णय दिला. सदर प्रकरण प्रतिनियुक्त अभिमत नियमानुसार मुख्य निवडणूक आयुक्तांकडे दिला आहे. याच प्रश्नासंदर्भात ७ फेब्रुवारी १९९५ मध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाची कर्मचारी संघटनेच्या याचिकेवर निर्णय देताना मुख्य न्यायाधीश अहमदी यांनीदेखील निवडणुकीच्या कामाकरिता नेमलेल्या सेवकांवर आदेश दिले.

शासनाची विश्वासार्हता व मदतीची हमी असल्याशिवाय निवडणूक आयोगास निवडणूक घेणे शक्य नाही असे मत टी. एन. शेषन यांनी २६ मार्च १९९३ रोजी व्यक्त केले. मंत्रिमंडळाचे सचिव एस. राजगोपाल यांच्याशी झालेल्या पत्रव्यवहारामध्ये संविधान ३२४ कलम ६ नुसार सर्व राज्यशासनाने निवडणूक आयोगास संपूर्ण सहकार्य करणे बंधनकारक आहे असे टी. एन. शेषन यांनी लिहिले होते. परंतु एस. राजगोपाल यांनी यावर सहमती न दर्शविल्याने सदर प्रकरण पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्याकडे गेले. त्यावेळी ते अविश्वास ठरावाच्या कामात व्यस्त होते. त्यांनी श्री. शेषन यांचे म्हणणे खरे आहे परंतु संविधानिक बाबींमध्ये एवढ्यात निर्णय घेता येणार नाही. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयामध्ये गेले. तत्पूर्वी दि. २९/७/१९९३ व १/८/१९९३ रोजी पंतप्रधानांनी गृहमंत्रालयास पत्र पाठवून तामिळनाडूमधील पलानी व राणीपेट मतदारसंघांत जादा केंद्रीय पोलीस पाठविण्याचे आदेश दिले.

श्री. शेषन यांनी मार्च १९९२ मध्ये निवडणूक आयोगामार्फत भारत सरकारला काही दुरुस्त्या व सूचना पाठविल्या. त्यांच्या पुढील काही सूचना मान्य करण्यात आल्या :

- मतदान यंत्राचा वापर.
- मतदार केंद्रापासून २०० मीटरपर्यंत प्रचारास बंदी.
- बेकायदेशीर मतदानपेट्या बळकविणे किंवा मतदान यंत्रे बळकाविणे, बनावट मतदान करणे गंभीर गुन्हा आहे.
- लोकसभा किंवा राज्यसभेच्या उमेदवारांची शिफारस करताना वेगवेगळ्या विधिमंडळांच्या किमान १० मतदारांचे मत असणे आवश्यक.
- उमेदवारीचा अर्ज सादर करताना स्वतः उमेदवार त्याचा फोटो व त्यास ओळखणाऱ्या एक व्यक्ती यांनी निर्वाचन अधिकाऱ्यासमोर सादर करावा.
- प्रचारमोहिमेचा कालावधी फक्त १४ दिवस.

- उमेदवाराने एकावेळी फक्त एकाच मतदार संघातून निवडणूक लढवावी.
- उमेदवाराने निधन झाल्यास दोन दिवसांत पक्षाने दुसऱ्या उमेदवाराचे त्वरित नाव सुचवावे म्हणजे फेरमतदानाची तारीख जाहीर करता येते.
- मतदार प्रतिनिर्धीना मतदान केंद्रामध्ये मज्जाव.
- केंद्रीय पोलीस प्रशासनाची भूमिका स्पष्ट करणे.
- पोलीस प्रशासनास निवडणुकीत त्यांच्या भूमिकेबाबत प्रशिक्षण देणे.
- १८ वर्षे पूर्ण झालेल्या व्यक्तींचे लिंगनिहाय मतदार यादीत नाव नोंद करणे.
- मतदारांची नाव नोंद करताना प्रत्येकाची वैयक्तिक माहिती व आक्षेप नोंदवावा.
- उमेदवारी अर्ज रद्द करण्याचा अधिकार जिल्हा निवडणूक आयुक्तांकडे (मुख्य निर्वाचन अधिकाऱ्यांऐवजी).
- मतदार संघांची पुनर्रचना त्या त्या वेळी झालेल्या किंवा लगतच्या जनगणनेच्या आधारे करण्यात यावी.
- एका ठिकाणी मतदार नावनोंदणी केल्यानंतर भारतामध्ये दुसरीकडे नोंदणीचा अर्ज करू नये.
- जन्म व मृत्यू नोंदणी अधिकाऱ्याने १८ वर्षावरील मृत व्यक्तींची माहिती जनगणना किंवा निर्वाचन अधिकाऱ्यास द्यावी.
- मतदारांची नावे, याद्या इत्यादी सर्व माहिती संगणकामध्ये संकलित करावी. त्यामुळे आवश्यकता वाटल्यास केव्हाही पाहता येणे, दुरुस्त्या करणे शक्य होते.
- निवडणूक सहाय्यकांचा सर्व खर्च भारत सरकारने करावा. राज्यांवर त्याचा अधिभार ठेवू नये.
- दर पाच वर्षांनी मतदार याद्या दुरुस्त करण्याऐवजी दोन वर्षांनी उजळणी करण्यात यावी. हे खर्चिक काम आहे. परंतु जास्त त्रासदायक नाही.
- मतदानाच्या दिवशी त्या अगोदरच्या व नंतरच्या दिवशी मतदान मोजणीचे व निकालाच्या दिवशी मद्य विक्रीस मनाई करण्यात यावी.

टी. एन. शेषन यांनी एवढ्या छोट्या छोट्या मुद्यांवर लक्ष ठेवून त्यांच्या अंमलबजावणीसाठी निरनिराळ्या स्तरांवर केलेले प्रयत्न यांचा प्रभाव व उपयोग सध्याच्या परिस्थितीत पहावयास मिळतो. म्हणूनच टी. एन. शेषन यांचे नाव इतर निवडणूक आयुक्तांपेक्षा जास्त लक्षात राहणारे आहे. परंतु काहींनी त्यांना वादग्रस्त व्यक्तिमत्त्व म्हणून संबोधले. शेषन यांना मर्यादा याव्यात म्हणून काही राजकारण्यांनी त्यांना शह देण्याचे ठरविले. नंतर अनुच्छेद ३२४ (२) मधील तरतुदीनुसार प्रस्ताव ठेवला. तो संसदेमध्ये मंजूरही झाला. परंतु शेषन यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली व बहुसदस्यीय निवडणूक आयोगास विरोध दर्शविला. सर्वोच्च न्यायालयाने संविधानात ३२४ (२), लोकप्रतिनिधित्व कायदा १९५०, १९५१ यांचा आधार घेऊन पुढील निकाल दि. १५ नोव्हेंबर १९९३ रोजी दिला. ''निवडणूक आयोग जरी स्वायत्त असला तरी केंद्रीय व राज्य लोकसेवा आयोग, विधिमंडळ, सर्वोच्च न्यायालयाप्रमाणे बहुसदस्यीय असावा'' या निर्णयानुसार त्वरित दोन निवडणूक आयुक्त (एम. एस. गिल व जी.व्ही.जी. कृष्णमूर्ती) यांची नेमणूक केली.

टी. एन. शेषन, एम. एस. गिल, जी. व्ही. एस. कृष्णमूर्ती यांच्यामध्ये प्रत्येकाला असलेल्या अधिकाराबाबत कायमच वाद होत असत. त्याची काही उदाहरणे खालीलप्रमाणे :

राजस्थानमध्ये ५८ मतदार संघांत फेरमतदान घेण्याचा प्रस्ताव गिल व कृष्णमूर्ती यांनी ठेवला. शेषन यांनी त्यास नकार दिला व फेरनिवडणुका घेऊ नयेत असा आदेश दिला. नोव्हेंबर १९९३ मध्ये मतदान केंद्राजवळ वार्ताहरांना फोटो किंवा इतर माहिती मिळविण्यासाठी शेषन यांनी सर्व वार्ताहराना मुभा दिली. परंतु डॉ. गिल यांनी त्यास विरोध करून एका वार्ताहरास फक्त ५ मतदान केंद्रांच्या ठिकाणी माहिती घेता येईल असे सुचविले. श्री. कृष्णमूर्ती यांनी स्वतःची सही असलेले एका परिपत्रकात असे म्हणाले ''इतर दोन निवडणूक आयुक्तांचा अथवा त्यांच्या निर्णयाचा उल्लेख नसलेले श्री. शेषन यांच्या सहीचे/स्वाक्षरीचे आदेश ग्राह्य धरू नये. या आदेशाचे पालन न करणाऱ्यांवर भारतीय दंड विधान १६६ नुसार कारवाई केली जाईल.'' श्री. कृष्णमूर्ती यांनी श्री. शेषन यांना एक टिपण्णी पाठवून श्री. गिल व स्वतः यांना संविधान व राष्ट्रपती अध्यादेश ३२ (१९९३) आणि संसदेचा (नियम २, १९९१) अवमान करीत आहात व आम्हा दोन्ही निवडणूक आयुक्तांना निवडणुकीच्या राष्ट्रीय कार्यापासून हेतुपुरस्सर दूर ठेवीत आहात असा आरोप केला. तत्कालीन राष्ट्रपती यांनी व सर्वोच्च न्यायालयाने मुख्य निवडणूक आयुक्त व इतर दोघा आयुक्तांना त्यांचे अधिकार व इतर बाबी या अंतर्गत सामंजस्याचा भाग आहे. त्यांच्याबाबत खूप वादविवाद करू नये असे सांगितले.

शेषन निवृत्त होण्याआधी चार महिने भेटीसाठी इतरत्र जात होते. त्यावेळी निवडणूक आयोगाच्या काही सभा आयोजिल्या होत्या. त्याची सूचना श्री. शेषन यांना देखील दिली होती. या सभेमध्ये काही निर्णय घेतले गेले. शेषन या सभांना उपस्थित राहू शकले नाही व ते भेटी संपवून आले असता या निर्णयांवर हस्तक्षेप घेतला. परंतु श्री. गिल यांनी त्यांना स्पष्ट शब्दांमध्ये खडसाविले. आपली सेवानिवृत्तीची काही महिनेच राहिले आहेत. आपण उपस्थित नसताना सदर निर्णय घेतला गेला नसता आणि त्यामुळे काही बिकट परिस्थिती निर्माण झाली असती, तर निवडणूक आयोगावर टीका किंवा आक्षेप घेतला असता. त्यामुळे शेषन यांचा आक्षेप शिथिल झाला.

शेषन यांच्या निवृत्तीनंतर डॉ. एम.एस. गिल यांना मुख्य निवडणूक आयुक्तपदावर नेमले. गिल जेवढे शेषन असताना आक्रमक होते, त्यापेक्षा ते मुख्य निवडणूक आयुक्त पदावर आल्यानंतर थंडावले. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांशी व राजकीयांशी कोणतेही वादविवाद न घालता पाच वर्षे पूर्ण केली. त्यानंतर जे. एम. लिंगडोह यांची मुख्य निवडणूक आयुक्त पदावर नियुक्ती झाली. एम. एस. गिल यांनी आपल्या सहकाऱ्यांना ज्या पध्दतीने निवडणुकीच्या निर्णयांमध्ये तसेच कार्यपध्दतीमध्ये समाविष्ट करून घेतले, तसेच लिंगडोह यांनीदेखील धोरण अवलंबिले होते. त्यामुळे लिंगडोह यांच्या कारकिर्दीत जास्त वादविवाद झाले नाहीत. त्यामुळे जम्मू आणि काश्मीर व गुजरातमध्ये २००२ साली लिंगडोह यांची भूमिका महत्त्वाची ठरली. २००२ मध्ये सरकार बरखास्त झाल्यानंतर सहा महिन्यांत निवडणुका (नियमातील कालावधी) घेण्यासाठी लिंगडोह यांनी तारीख जाहीर केली. परंतु गुजरातमधील भाजपचे ज्येष्ठ नेते यांनी लिंगडोह यांच्यावर जातीयवादाचा आरोप केला. श्री. लिंगडोह हे ख्रिश्चन समाजाचे तसेच कॉंग्रेस (आय) चा वरदहस्त असलेले निवडणूक आयुक्त आहेत, त्यामुळे गुजरातच्या निवडणुकीचा निर्णय घेताना पक्षपातीपणा करीत आहे असे श्री. मोदी यांचे म्हणणे होते. परंतु हा वाद मूळ नियमाबाबत होता. लिंगडोह यांना सरकार बरखास्त झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत व लवकरात लवकर निवडणुका घ्यावयाच्या होत्या. मंत्रिमंडळ बरखास्तीची तारीख ३ मार्च किंवा बरखास्तीची तारीख १९ जुलै यावर त्यांचा वाद चालू होता. या प्रकरणावर पाच न्यायाधीशांचा अभिप्राय देण्याकरिता नेमले. त्यामध्ये मुख्य न्यायाधीश बी.एन. कृपाल, न्यायाधीश व्ही. एन. खरे, के.जी. बालकृष्णन, अशोक भान, अरिजित पसायल यांचा समावेश होता. न्यायालयाने उपरोक्त तारखांऐवजी नोव्हेंबर किंवा डिसेंबरमध्ये निवडणुका घ्याव्यात असा आदेश दिला.

टी. एस. कृष्णमूर्ती यांची दि. ८/२/२००४ रोजी मुख्य निवडणूक आयुक्त पदावर नेमणूक झाली. कृष्णमूर्ती फक्त १५ महिने त्या पदावर होते. परंतु त्यादरम्यान त्यांनी नुसते भारतातच नव्हे तर युगांडा, अमेरिका, इराक, दक्षिण आफ्रिका, बांगलादेश इत्यादी देशांमध्ये जाऊन काहींना भारतामध्ये बोलावून निवडणूक विषयांबाबत कार्यप्रणाली अवलंबण्यासाठी सामंजस्य करार घडवून आणले. त्यामुळे भारतीय निवडणूक प्रणाली व प्रशासनाचा संपूर्ण जगात नावलौकिक झाला. कृष्णमूर्ती यांनी मतदान अधिकाऱ्यांची कामाची विभागणी थोड्या वेगळ्या पध्दतीने केली. जे मतदान केंद्र आणि मतदारसंघ जास्त संवेदनशील आहेत, अशा ठिकाणी जवळच्या इतर जिल्ह्यातील किंवा शहरातील शासकीय सेवक व अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. २००४ साली झालेल्या निवडणुकीत त्यांनी पश्चिम बंगाल येथील काही संवेदनशील मतदान केंद्रावर नजीकच्या जिल्ह्यातील बंगाली भाषा येणाऱ्या शासकीय सेवकांची नियुक्ती केली. त्यामुळे निवडणूक अधिकाऱ्यांवर दबाव आणून कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. श्री. कृष्णमूर्ती यांनी मतदान यंत्राचा जास्तीत जास्त वापर करण्यासंबंधी २००४ च्या निवडणुकीत सूचना दिल्या व त्या प्रत्यक्षात अमलात आणल्या. तसेच निवडणुकांतील भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यात ते यशस्वी झाले. पाकिस्तानातील काही निर्णय घेणाऱ्या अधिकाऱ्यांनी निवडणूक मतदान यंत्राबाबत प्रशंसा केली. पाकिस्तानचे मुख्य निवडणूक आयुक्त न्यायाधीश इर्शद हसन खान २००४ मध्ये यांची भारतभेट व मे २००५ मध्ये कृष्णमूर्ती यांची पाकिस्तानचे पंतप्रधान शौकत अझिज यांची भेट ही या निवडणूक प्रणालीमुळे झाली. ७ जून २००४ रोजी भारताचे राष्ट्रपती अब्दुल कलाम यांनी १४ वी लोकसभा निवडणूक मतदान यंत्राव्दारे यशस्वी केल्याबद्दल श्री. कृष्णमूर्ती यांचे कौतुक केले. या दरम्यान माहितीचा अधिकार अस्तित्वात आला होता. त्यामुळे जनतेची निवडणूक प्रक्रियेबाबत विश्वासार्हता वाढवण्यासाठी संसदेमार्फत सहकाऱ्यांशी विचारविनिमय करून प्रसारमाध्यमे, काही अशासकीय संस्था यांच्यामार्फत लोकांमध्ये निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता पोहोचविली. तसेच एस.एम.एस. व्दारे उमेदारांना व पक्षांना परवानगी देण्यात आली. निवडणुकीची तारीख व वेळ लक्षात राहण्यासाठी मतदारांना मुख्य निर्वाचन अधिकारी व मोबाईल ऑपरेटर यांच्यामार्फत एस.एम.एस. पाठविण्याचा प्रयोगही यावेळी केला. मतदान यंत्रांमुळे ५४३ मतदारसंघांचे निकाल काही तासांमध्ये जाहीर झाले. श्री. कृष्णमूर्ती यांना त्यानंतर भारतातील नव्हे तर जगभरातील लोकांनी ई-मेल, पत्रांव्दारे प्रशंसा केली.

दि. २३ एप्रिल २००९ रोजी महाराष्ट्रातील २५ लोकसभा मतदार संघांत मतदानाचा दुसरा टप्पा होता. या दिवशी महाराष्ट्र शासनाने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू केला. आचारसंहिता लागू असताना असे धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार कोणत्याही शासन व्यवस्थेला नाही. परंतु महाराष्ट्र शासनाने केंद्रीय निवडणूक आयोगाच्या शिफारसीनुसार सदर वेतन आयोग जाहीर केला. दि. २७ फेब्रुवारी २००९ रोजी शासन निर्णय काढण्यात आला परंतु दि. २ मार्च २००९ रोजी लोकसभेची निवडणूक जाहीर होऊन आचारसंहिता लागू झाल्याने अधिसुचना काढता आली नाही. मा. राज्यपालांच्या सुचनेनुसार शासनाने यासंदर्भात निवडणूक आयोगाची परवानगी घेऊन नंतरच सहावा वेतन आयोग लागू करण्याचे जाहीर केले.

आजपर्यंत बऱ्याच वेळा मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती कालावधीचा अभ्यास केल्यास असे निदर्शनास येते की तीन ते साडेतीन वर्षांपेक्षा जास्त कालावधीत नेमणुक झालेले २ ते ३ च आयुक्त होते. याचा राजकीय अभ्यास केल्यास असे निदर्शनास येते की शासकीय सेवक अथवा अधिकारी त्यांच्या सेवानिवृत्तीच्या शेवटच्या २-३ वर्षांमध्ये कोणतेही धाडसी, धोरणात्मक अथवा गुंतागुंतीचे निर्णय घेत नाहीत. कारण सेवानिवृत्तीच्या वेळी चौकशी समिती, निलंबन, दोषारोप ठेवू नयेत याची दखल घेतात. आणि म्हणूनच सेवेची शेवटची २-३ वर्षे उर्वरित सेवा असलेल्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या जातात.

**संदर्भ :**

१) य. दि. फडके : लोकसभा निवडणुका १९५२ ते १९९९ : अक्षर प्रकाशन, मुंबई.
२) दिलीप शिंदे : निवडणूक विषयक कायदे : साकेत प्रकाशन, १९९९.
३) Alistair M C Millan : The Oxford Companion To Politics in India : Oxford University Press, New Delhi : २०१०.
४) T.S. Krishnamurthy : The Miracle of Democracy : India's amazing journey : Happer Collin, Delhi : २००८.
५) Raisa Ali : Representative Democrocy and Concept of Free & Fair Elections : Deep & Deep Publication, New Delhi : १९९६.
६) B. Venkateshkumar : Electronics Reforms in India : Current Discourses, Rawat Publication, New Delhi : २००९.
७) The Telegraph : Aug. २८, २००८.
८) दैनिक सकाळ अंक दि. २३ एप्रिल २००९.



डॉ. तुषार निवृत्ती निकाळजे

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : http://oldror.lbp.world/